# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

## रेती घाट ई-टेंडरींग व ई-लिलावाच्या संक्षिप्त अटी व शर्ती (ई-टेंडरींग-नि-ई-लिलाव)

सन २०१६-१७ करिता दि. ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत मुदतीसाठी वाळू / रेती निर्गती नवीन धोरण शासन (महसूल व वन विभाग) निर्णय क्र. गौखनि-१०/०५१२/प्र.क्र.३००/ख दिनांक १२ मार्च २०१३ तसेच शासन (महसूल व वन विभाग) निर्णय क्रमांक गौखनि-१०/ख/४९८/प्र.क्र./१०१४ दिनांक २३ डिसेंबर, २०१४ अन्वये रेती घाट ई-टेंडरींग-नि-ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१. अमरावती जिल्हयातील सन २०१६-१७ या वर्षाच्या वाळू/ रेती लिलाव पर्यावरण अनुमतीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

(अ) सदरचे लिलाव हे दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंतच्याच कालावधी करीता राहतील.

(क) एखाद्या रेती गटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाली नाही, तर लिलावाधारकास फक्त त्याने भरलेली १/४ रक्कम परत करण्यात येईल. त्याकरिता लिलावधारकास कोणताही दावा/व्याजाची मागणी करता येणार नाही.

(ड) लिलाव अंतिम केल्यानंतर लिलावाच्या बोली प्रमाणे उर्वरीत ३/४ रक्कम भरुन घेऊन लिलावधारकास वाळू/रेतीगटाचा ताबा देण्यात येईल.

लिलावाची कार्यवाही करताना ज्या वाळु गटांना पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त झाली त्या वाळु गटांच्या ई-टेंडरींग-ई-लिलावानंतर प्राप्त सर्वोच्च बोलीची रक्कम मंजुर करण्यांत येईल.

२. प्रचलित पध्दतीनुसार अमरावती जिल्हयातील रेती घाटाचे ई-टेंडरींग-ई-लिलाव करते वेळी सर्व प्रथम जिल्हा, तदनंतर तालुकावार आलेल्या संयुक्त रेती स्थळांच्या अपसेट किंमती पेक्षा जास्त किमत प्राप्त झाल्यास त्या किंमतीस प्रथम, व्दीतीय हया प्रमाणे प्राधान्य देण्यांत येईल. अशा प्रकारची बोली प्राप्त न झाल्यास वाळुघाट निहाय प्राप्त ई-टेंडर-ई-लिलावाला नियमानुसार मंजुरी प्रदान करण्यांत येईल.

३. ई-टेंडरिंग उघडल्यानंतर उच्चतम प्राप्त रक्कमे वरुन त्या रेतीघाटाचा ई-लिलाव घेण्यात येईल. त्या ई-लिलावात उच्चतम बोली बोलणा-याचे नावे त्या रेती घाटचा लिलाव मंजूर करण्यात येईल. **मात्र सदरच्या ई-लिलावास फक्त त्या त्या रेती गटाबाबत ई-टेंडर भरणा-यांनाच भाग घेता येईल, इतराना भाग घेता येणार नाही.** ई-लिलावात बोली न आल्यास ई-टेंडरच्या उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल.

४. अमरावती जिल्हयातील रेतीघाट लिलाव सन २०१६-१७ करिता दि. ३०/०९/२०१७ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविद-ई-लिलाव द्वारे निर्गती करणेसाठी ई-निविदा https://eauctioncollamr.abcprocure.com या वेबसाईटवर तसेच ई-लिलाव https://www.eauctioncollamr.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीच्या amravati.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. **ई-निविदा-ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता कंत्राटदारांना डिजिटल-सिगनेचर असणे तसेच उपरोक्त वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.** ई-निविदा नमुना फॉर्म, प्रतिज्ञापत्र, रेती स्थळांची/गटाची यादी, अटी व शर्ती, रु. ६५५३/- (ना-परतावा) टेंडर फी ई-पेमेंट जसे नेट-बँकिंग/केडीट-कार्ड/डेबिटि-कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने ICICI Bank, अमरावती यांचे कडे रु. ६५५३/- (मात्र वाळू गटाची हाताची किमत रु. १० लाख व त्यापेक्षा कमी असेल अशा वाळू गटा साठी अर्जाचे शुल्क रु. ३५५३/-) भरना करुन वरील वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन खरेदी करता येईल. रेती स्थळ/गटा संबंधी ची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवरही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. लिलावाच्या ई-निविदा-ई-लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणुन रुपये ३,००,०००/- किंवा अपसेट प्राईजच्या २० टक्के रक्कम या पैकी जी जास्त असेल ती रक्कम ई-पेमेंट जसे नेट-बँकिंग/ केडीट-कार्ड/ डेबिट-कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने ICICI Bank, अमरावती यांचे मार्फत भरावा लागेल. ज्या ई-टेंडर/बोलीदाराची अत्युच्य बोली स्विकारण्यात येईल त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या

१/४ इतक्या रकमेत समायोजीत करण्यात येईल. ज्या बोलीदारांची बोली स्विकारण्यात येणार नाही त्यांच्या अनामत रकम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

ब) ई-निविदा सोबत लिलावधारकास ठराविक नमुन्यातील डाऊन-लोड केलेला अर्ज भरुन तसेच रु. १००/- स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र, पॅन कार्ड (PAN CARD) आणि विक्रीकर विभागाचा रजिस्ट्रेशन क्रमांक (TIN CARD) विहित कालावधीत अपलोड करणे बंधनकारक आहे. <u>पॅन कार्ड व टीन क्रमांक असलेल्या ई-निविदा-ई-लिलाव धारकांनाच लिलावात सहभागी होता येईल.</u>

६. नियमित आयकर भरत असल्याच्या पुरावा, पॅन क्रमांक व विक्रीकर विभागा च्या टिन (TIN) क्रमांक, कंपनी/ फर्म असल्यास रजिस्ट्रेशनाची प्रत असलेल्या निविदा धारकांच्याच ई-निविदा वैध ठरविल्या जातील. ज्या निविदाधारकानी निविदे सोबत आवश्यक कागदपत्रे जसे पॅन क्रमांक, टिन क्रमांक व अनामत रक्कमेचा ई-पेमेंट केल्याचे पुरावे जोडले नाहीत अशा निविदा धारकांची निविदा अवैध ठरविण्यात येईल.

७. ई टेंडर-ई-लिलाव पध्दतीने रेती/वाळू निर्गती करणेसाठी खालील प्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

**<u>ई -टेंडर व ई-लिलाव करणेसाठी वेळपत्रक खालील प्रमाणे आहे.</u>**
**(तिसरा टप्पा- पाचवी फेरी)**

| दिनांक | तपशील |
|---|---|
| ०७.०४.२०१७ | सकाळी १०.०० वाजे पासून बिडर रजिस्टेशन ऑन-लाईन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १३.०४.२०१७ | सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदाधारकाचे ऑनलाईन रजिस्टेशन करणे (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| १०.०४.२०१७ | सकाळी १०.०० पासून निविदाधारकास ऑनलाईन ई-निविदा भरणे (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १७.०४.२०१७ | सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन पध्तीने (संगणकीय) स्वीकारणे बंद होईल. |
| १८.०४.२०१७ | सकाळी १० वाजता पासुन गट केलेल्या व त्यामधील प्रत्येक रेती स्थळांचे ई-निविदा जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील सभागृहात डाऊनलोड करुन उघडण्यात येईल. |
| १९.०४.२०१७ | ई-ऑक्शन (ई-लिलाव) खालील प्रमाणे करण्यात येईल.<br>गट (लॉट) क्रमांक- १ ते ४ सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत.<br>(वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणाली व्दारे प्रत्येकी १० मीनीट प्रमाणे फक्त ३ (तिन) वेळा वाढ करण्यात येईल). लिलावाची बोली (Increment amount) कमीतकमी अपसेट प्राईजच्या १ टक्के (पूर्णांकात) वाढीव दराने असून अमर्यादित असेल.<br>त्यानंतर ई-लिलाव बोली उघडण्यात येईल. |

७. रेती/वाळू स्थळ/गटाकरिता फक्त ई-निविदा स्विकारण्यात येतील. ज्या निविदाधारकांनी संकेतस्थळावर दिलेल्या ई-निविदा भरल्या नाहीत अशा निविदाधारकांच्या निविदा अवैध ठरविण्यात येतील. व त्यांना त्यानंतर होणा-या ई-लिलावात सुध्दा भाग घेता येणार नाही. या बाबत कार्यालयात दाद मागण्याचा अधिकार राहणार नाही.

८. वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (सरकारी किंमती) पेक्षा अधिक किंमती च्या ई-निविदा धारकांनाच त्या त्या रेती गटाचा ई-लिलावात भाग घेता येईल व रेती घाटा ची निर्गती करण्यात येईल.

९. ई-लिलाव उघडण्याच्या दिवशी निविदाधारकाने निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेली कागदपत्रे व २५% रक्कम ई-पेमेंट केल्याबाबतचा पुरावा सोबत आणावे व ज्या निविदाधारकाची निविदा सर्वोच्च आहे अशा निविदाधारकाने स्वाक्षरी केलेली निविदा कागदपत्रे व ई-पेमेंट बाबतचा पुरावा सादर करावित.

१०. ई-निविदा-ई-लिलाव द्वारे प्राप्त झालेले देकार सरकारी किंमती पेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटा च्या फेर ई-निविदा/लिलाव बोलाविण्यात येईल.

११. ई-निविदे-ई-लिलाव द्वारे घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत निविदा/लिलावधारका ची राहील.

१२. सर्वेच्च ई-टेंडरिंग/ई-लिलावधारकास ज्यांची ई-निविदा/ई-लिलाव स्विकारण्यात येईल त्याला त्यांनी दिलेल्या निविदेच्या/ई-लिलावाच्या रकमेच्या १/४ इतकी रक्कम ई-निविदा/ई-लिलाव संपताच दुसरा दिवशी ICICI Bank येथे भरावी लागेल अन्यथा निविदा/लिलाव रद्द करण्यात येईल.

१३. ई-निविदा अथवा ई-लिलाव स्विकारणे किंवा नाकारणे तसेच तांत्रिक अडथडा निर्माण झाल्यास पुढे ठेवण्या संबंधीचा अधिकार जिल्हाधिकारी अमरावती यांनी राखून ठेवला आहे.

१४. सर्वोच्च ई-निविदा-ई-लिलाव स्वीकारल्या नंतर व १/४ रक्कम भरल्या नंतर १५ दिवसांत ई-निविदेतील/ई-लिलावातील नमूद केलेली उर्वरित ३/४ रक्कमे चा भरणा करणे बंधनकारक आहे. अशा हमी चे दायीत्व स्वीकारणाऱ्या दोन व्यक्तीसह टेंडरधारक त्यांचे ई-निविदा-ई-लिलावामधील सर्वोच्च बोलीच्या १० टक्केप्रमाणे सदर रेती घाटाबाबत बाजारमुल्याची गणना करुन येणाऱ्या रकमेच्या ३ टक्के प्रमाणे स्टॅम्प डयुटी व १ टक्के प्रमाणे रजिस्ट्रेशन फि इतक्या रकमेचा भरणा करुन मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व निविदा रद्द करुन संबंधीत रेती घाटा च्या फेर निविदा बोलाविण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्या च्या परिणामी टेंडरधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानी ची जबाबदारी शासनावर राहणार नाही. टेंडर मधील नमूद रकमेपैकी भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली ७५% रक्कम सर्वोच्च ई निविदा/लिलाव स्विकारल्यापासून १५ दिवसात एक रकमी भरावी लागेल. अन्यथा निविदा/लिलाव रद्द करण्यात येईल व १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित रेती घाटाच्या फेर निविदा/लिलाव बोलाविण्यात येईल. टेंडरधारकाने शिल्लक राहीलेली ७५% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा देण्यात येईल.

१५. रेती / वाळू (ठेका) ई निविदा/लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या रेती/ वाळू क्षेत्रा चा नव्याने जाहीरनामा काढून फेर निविदा/लिलाव बोलाविण्यात येईल. फेरनिविदेत पुर्वी च्या निविदा किंमती पेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या टेंडरधारकाकडून जमीन महसूला ची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि फेरनिविदेत पुर्वी च्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पुर्वीच्या निविदाधारकास कोणताही हक्क राहणार नाही.

१६. निविदाधारक, त्यांच्या ई-निविदा क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/ वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातुन वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार - नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्णय अंतिम असतील.

१७. विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्ती च्या खाजगी मालकी च्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या

क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/ वाळू काढता येणार नाही तसेच रस्ते / पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनितून रेती/ वाळू काढता येणार नाही.

१८. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. १०/०६१६/प्र.क्र.३९०/ख दिनांक ०३/०७/२०१६ नुसार नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूच्या उत्खननासाठी सक्शन पंपाचा वापर सर्वसाधारणपणे अनुज्ञेय नाही. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत सार्वजनिक हितार्थ (उदा. पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन गावांना पुराचा पुराचा धोका निर्माण होऊ नये म्हणून) पाण्याखालील वाळू/ रेती उत्खननासाठी, संदर्भाधीन क्रमांक २ वरील केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या क्रमांक का.आ.१४१/(अ), दिनांक १५/०१/२०१६ च्या अधिसूचनान्वये जिल्हास्तरावर गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तज्ञ मुल्याकन समिती (DEAC) व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण समिती (DEIAA) यांच्या शिफारशी प्राप्त करुन विभागीय आयुक्तांच्या पूर्वमान्यतेशिवाय सक्शन पंपाचा वापर करता येणार नाही.

१९. कोणत्याही रेल्वे च्या पुला च्या कोणत्याही बाजूने ६०० मीटर्स (२००० फुट) अंतरा च्या आत रेती चे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी-नाल्यांवर पूल आहेत, त्या च्या स्तंभापासुन १०० मीटर्स पर्यंत उत्खनन करता येणार नाही. तसेच अस्तितवात असलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा उदभवाचे किंवा स्त्रोतचे ५०० मी परीसरात रेती उत्खखन करता येणार नाही.

२०. जेथे वाळू उत्खनन चालू आहे. त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्रा ची सीमा निश्चित करुन दर्शविण्यात यावी. तसेच रेतीघाट लिलावधारकास लिलाव कायम केल्यानंतर सदर रेतीघाटाच्या विस्तृत माहिती असलेला (रेतीघाट लिलावधारकाचे नांव, रेतीघाटाचे गट नं./स.नं, रेतीघाटाचे एकूण क्षेत्रफळ, उपलब्ध रेतीसाठा, रेतीघाटासंबंधी नकाशा) लोखंडी फलक लावणे बंधनकारक राहील.

२१. वाळू चे/रेती चे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/ नुकसाना पोहचल्यास त्या ची भरपाई करण्याचे दायित्व निविदाधारकावर राहील. अशा हानी ची/ नुकसानी ची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसूला च्या वसूलीप्रमाणे संबंधीत निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

२२. ई-निविदेद्वारे दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्रा चे उत्खनन करण्यास किंवा रेती/ वाळू काढण्यास बंदी घातल्यास निविदाधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

२३. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूचे/रेतीची साठवणुक फेर विक्री साठी करता येणार नाही. वाळु/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळूचे/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपण्या पूर्वीच उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूचा/रेतीच्या किंमती बाबत अथवा मालकी बाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासना विरुध्द दावा करता येणार नाही.

२४. रेती / वाळु उत्खनन करताना अथवा हलवितांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

२५. महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारीत सुलभ SMATS ( Sand Mining Approval and Tracking System) प्रणाली राज्यात अनिवार्य स्वरुपात सन २०१४-२०१५ पासून लागु करण्यात आली असल्याने वाळू / रेती लिलावधारकांना या प्रणालीचा वापर अनिवार्य राहील.

२६. सदर प्रणालीनुसार लिलावधारकांना त्याचे ३ मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील.

२७. प्रत्येक लिलावधारकाने निर्धारीत वाळूगटातुन वाळूचे उन्खनन करुन वाळूचे वाहनामधिल परिमाण, वाळूगटाचे नाव / क्रमांक, वाहन क्रमांक, कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकांणामधिल अंतर इत्यादी तपशिल,) SMS नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडुन लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या त्या विनंतीनुसार एसएमएस द्वारे टोकन नंबर प्राप्त झाल्यानंतरच त्यास वाळू/ रेती वाहतुक करता येईल.

२८. वाळू/ रेती वाहतुक करणाऱ्या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किंवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतुक अवैध ठरेल.

२९. वाळू / रेतीची वाहतुक करणाऱ्या वाहनचालकाकडे (टोकन नंबर आहे किंवा नाही याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून तथा नियुक्त अधिकारी किंवा भरारी पथकाकडून केले

जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर वाळूचे उत्खनन/ वाहतुक अवैध समजून त्याचे विरुध्द महाराष्ट जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८(७), आणि संदर्भाधीन महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन ( विकास व विनियमनन ) नियम, २०१३ दिनांक १२.३.२०१३ मधील निर्धारीत तरतूदीनूसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

३०. वाळू / रेती लिलावधारकाने नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक पमिाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कार्यवाही तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/ वाळूचे केलेले उत्खनन, विक्रि व वाहतुक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

३१. निविदाधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच लिलावधारकाचे नांव, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

३२. ई-निविदे द्वारे विक्री केलेल्या स्थळाचा किंवा रेती/ वाळू ठेक्याचा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा राहील व तो सर्व साधरणत: १ ऑक्टोंबर ते ३० सप्टेंबर असा राहील. ई-निविदा घेण्याची तारीख काहीही असली तरी ई-निविदा वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजीच संपुष्टात येईल. ई-निविदेद्वारे दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलुन दिला जाणार नाही.

३३. उत्खनन केलेल्या वाळूच्या/ रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच निविदा धारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/ वाळू घाट बदलून दिला जाणार नाही. वापरात असलेल्या रस्तांची दागडुजी लिलावधारकास करावी लागेल.

३४. नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/ वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

३५. रेतीचे/ वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून शासन निर्णय दि. १२ मार्च २०१३ नुसार रेतीच्या उपलब्ध प्रसतरातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सर्वेक्षणांनतर विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलुन अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी निविदाधारकाने घ्यावयाची आहे. भूजल सर्व्हेक्षण शुल्क रु. ५०००/- प्रती घाटचा डि.डि. उपसंचालक, भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, अमरावती यांचे नावाने जमा करावा लागेल.

३६. निविदाधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

३७. रेती/ वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास निविदाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

३८. गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकी च्या संबंधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावधारकाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे. आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत व कार्यालयात प्रत्येक पुढचे महिन्याच्या १० तारखे पर्यंत सादर करावे.

३९. निविदाधारकाने करारनामा करतेवेळी ई-निविदा अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु. ३.०० लाख किंवा लिलावाच्या किमतीच्या २० % यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. ही रक्कम निविदाधारकाने ई-निविदेच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, ई-निविदेची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल.

४०. ज्या व्यक्तीचा उच्चत्तम देकार स्विकारण्यांत येईल. त्यांना मंजूर रक्मेचे २ % रक्कम प्रमाणे पर्यावरण शुल्काचा भरणा करावा लागेल.

४१. रेती लिलावाच्या रकमेच्या २ % आयकर (Under Section 206 C (IC)) (TCS) तसेच १० % मुल्यवर्धित कर (व्हॅट) अगाऊ भरणा करणे बंधनकारक आहे.

४२. निविदाधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौणखनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम ( संबंधीत विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे निविदाधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूच केला पाहिजे.

४३. रेतीचे/वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास निविदाधारकाने/ ठेकेदाराने विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहिजे.

४४. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल. सार्वजनिक पाणवठा/ पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासुन १०० मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

४५. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे.

४६. मंजूर क्षेत्रातुनच मंजूर रेती साठा पेक्षा अधिक रेतीची उत्खनन व वाहतुक करता येणार नाही. मंजूर परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर निविदाधारकास कोणताही अधिकार राहणार नाही व मंजूर परिमाणा पेक्षा अधिक उत्खनन व वाहतुक केल्याचे आढळल्यास ज.म.अ.१९६६ च्या तरतूदीनुसार दंडास पात्र राहील.

४७. अवैध वाळू/ रेती साठा पकडल्यांतर महाराष्ट्र जमीन महसूल अधियिम, १९६६ मधील ४८ (७) व कलम ४८ मधील पोट कलम(८) (१), (८) (२) नुसार कारवाई करण्यात येईल. लिलावधारकानी त्यांनी दिलेल्या करारनाम्यातील कुठलीही अटीचे भंग केल्यास सक्षम प्राधिकारास लिलाव रद्द करण्याव्यतीरिक्त योग्य शास्ती लादता येईल.

४८. दर महिन्याचे दुसऱ्या व चौथा रविवार रोजी मंजुर केलेल्या रेती घाटातून रेती उपसा करण्याचे काम बंद ठेवावे लागेल.

४९. पर्यावरणाचे संतूलन राखणेसाठी निकामी वाळूचें साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

५०. विक्रीकर भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. तसेच आयकर व मुद्रांक शुल्क रक्कम शासन जमा करुनच करारनामा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. या शिवाय जिल्हापरिषद कर/पंचायत कर इ. विहीत केलेल्या प्रमाणे संबंधित तहसिलदारांकडे अदा करावे.

५१. लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राची सक्षम विभागाकडून स्वखर्चेने मोजनी करुन घेवून सिमा दर्शविणारा फलक योग्य दर्शनीय ठिकाणी लावणे आवश्यक आहे. मंजूर क्षेत्राचा ताबा निविदाधारकानी संबंधित तहसिलदाराकडून प्राप्त करुन घ्यावा. मंजुर केलेल्या रेती घाटाचे स्वःखर्चानी तालुका निरिक्षक भूमी अभिलेखचे मोजणी व सिमांकण केलेला नकाशाचे दोन प्रती सादर करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

५२. रेती घाटाचा ताबा मिळाल्याची प्रत सादर केल्यानंतर मंजूर केलेला रेती साठा इतक्याच प्रमाणात रेती जावक पावत्या देण्यात येतील.

५३. वाळू उत्खनन व वाहतुक वाहनाची यादी वाळू उपसा पूर्वी तहसिल कार्यालयास सादर करावी लागेल. रेती/वाळू उत्खननाची वेळ सकाळी ६.०० ते संध्याकाळी ६.०० वाजे पर्यंतच राहील. त्यानंतर उत्खनन आढळल्यास अवैध समजण्यात येईल.

५४. रेती / वाळू घाटातील रेती/वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक पावती द्यावी व जिल्हाधिकारी कार्यालयास लिलावधारकाडून सादर करण्यात येणाऱ्या हिशेबात त्याच परिमाणाची नोंद घेण्यात यावी. याची सर्व जबाबदारी लिलावधारकाची राहील. त्यापेक्षा कमी परिमाणची नोंद हिशेबात घेतल्याचे आढळून आल्यास लिलावधारका विरुध्द नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

५५. सिलटेशन ( Siltation ) स्टडी बाबत चा अहवाल वाळु उत्खननापूर्वी अथवा वाळु उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी, तज्ञ एजंसी जसे NIO/CWPRS कडून करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ चंद्रपूर यांचेकडे सादर करावा लागेल.

५६. ज्या ठिकाणी कासवांची घरटी ( Turtle Nesting ) असेल त्या ठिकाणाहून वाळु उत्खनन करण्यांत येवू नये.

५७. मंजुर क्षेत्रापैकी कमीतकमी २० टक्के क्षेत्रामध्ये नदी तिरावर तसेच गावातील वाहतुक रस्त्यावर झाडे लावून हरीयाली ( Green Belt ) करावी लागेल.

५८. उत्खननच्या वेळी Soil erosion व Silt management च्या बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यांत याव्यात.

५९. उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करुन दयावी लागेल.

६०. आवश्यकता भासल्यास उत्खननाच्या जागेवर मजुरांना जेवण बनविणे, शुध्दपाणी, वैद्यकीय उपचार व इतर सुविधा उपलब्ध करुना दयावी लागेल.

६१. वार्षीक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

६२. ई-टेंडर धारकाने वाळु उत्खननाबाबतचा मासिक व सहामाही अहवाल झेरॉक्स् प्रत व सि.डि / पेनड्राईव्ह मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, MPCB Office व पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

६३. लिलावधारकास नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे व गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदी नुसार असलेले सर्व नियम, वाळू/रेती निर्गत संबंधित शासन निर्णय दि. १२ मार्च २०१३ व शासन/ जिल्हाधिकारी यांचे कडील वेळोवेळी निर्गत आदेश/परिपत्रक/सूचना इ. (संबधीत विभागास लागु असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागु असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६४. शासनास आवश्यकता भासल्यास रेती घाट रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहे.

६५. ई-निविदां/लिलावाचे अटी व शर्ती मध्ये बदल करण्यांचे तसेच पूर्व सूचना न देता लिलाव तहकूब करणे, रद्द करणे, तसेच ई-टेंडर/ई-लिलाव मंजूर/नामंजूर करणे इ. सर्व अधिकार जिल्हाधिकारी अमरावती यांनी राखुन ठेवले आहे.

६६. ई-निविदा, ई-लिलाव मध्ये भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ति/ संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

६७. शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

६८.महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. गौखनि-१०/०८१५/प्र.क्र..४४८/ख दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ मधील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

६९.जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समिती (DEIAA) यांचे पर्यावरण अनुमती दिनांक ३१/०८/२०१६ मध्ये निहित अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७०. तिवसा तालुकयातील मौजा कौडन्यपूर-१ व कौडन्यपूर-२ या रेतीघाटातील रेती/ वाळू पाण्याखालील असल्याने महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. गौखनि-१०/०६१६/प्र.क्र.३९०/ख, दिनांक ०२ जुलै, २०१६ मधील तरतूदीनुसार सदर रेतीघाटामधून रेती/ वाळूचा सक्शन पंपाच्या सहाय्याने उपसा करण्याची परवानगी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे कडून प्राप्त करुन घेऊनच रेती/ वाळचा उपसा करणे रेतीघाट लिलावधारकास बंधनकारक राहील.

जिल्हाधिकारी अमरावती